प्रेसनोट

दि. ३१/०५/२०१८

# लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या नव्या संकेतस्थळाचे लोकार्पण

**( www.acbmaharashtra.gov.in )**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म. राज्य च्या नव्या संकेतस्थळाचे लोकार्पण आज दि. ३१/०५/२०१८ रोजी ला.प्र.वि. चे अपर महासंचालक (अतिरिक्त कार्यभार महासंचालक) श्री विवेक फणसळकर, यांचे शुभहस्ते करण्यात आले. ला.प्र.वि. चे जुने संकेतस्थळ हे संगणकावर हाताळणे मर्यादित होते, परंतु नूतनीकरण केलेले www.acbmaharashtra.gov.in संकेतस्थळ हे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याने ते सहज मोबाईल, टॅब, आयपॅड या सारख्या आधुनिक उपकरणामध्येही सहजपणे वापरता येऊ शकते. विशेषतः दृष्टीहीन व्यक्तींना स्क्रीन रिडर सॉफटवेअर चा वापर करून सदरचे संकेतस्थळ वापरण्यास सुलभ केले आहे. तसेच त्यामध्ये सायबर सुरक्षेवर विशेष भर देण्यात आलेला आहे. नूतनीकरण केलेले संकेतस्थळ हे नागरिकांना सहज हाताळण्यायोग्य (user friendly), लोकाभिमुख बनविण्यात आलेले आहे.

नव्याने तयार करण्यात आलेले संकेतस्थळ हे मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत उपलब्ध आहे. त्यावर ला.प्र.वि. चा थोडक्यात माहिती, ला.प्र.वि. तर्फे करण्यात येणाऱ्या सापळा, अपसंपदा, अन्य भ्रष्टाचार इ. कारवाईची माहिती, सांख्यिकी विश्लेषण, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८, माहितीचा अधिकार अशी विविध प्रकारची माहिती प्रदर्शित करण्यात आलेली आहे. तसेच सदर संकेतस्थळावरून नागरिकांनी भ्रष्टाचाराला रोखण्यासाठी काय करावे व काय करू नये याबाबत सूचना देऊन जनतेला भ्रष्टाचार विरोधात सहकार्य करण्याकरीता आवाहन करण्यात आले आहे.

तरी नागरिकांनी या नवीन संकेतस्थळाचा वापर करून त्याची मदत घ्यावी.

31/5/18

(वंदना नारकर)
अपर पोलीस अधीक्षक (मुख्या.)
ला.प्र.वि. म. राज्य, मुंबई.